प्रेसनोट दिनांक १८/०५/२०१९

## विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर

## अपघात करुन पळुन गेलेला कार चालक यास कारसह ताब्यात घेवुन गुन्हा उघडकिस आणुन गुन्हयात अटक केले

दिनांक १५/५/२०१९ रोजी सायंकाळी १९/१५ वा. चे सुमारास इसम नामे नरसय्या येराय्या शेटटी वय ३७ वर्षे रा. कलवड वस्ती लोहगांव पुणे हे त्यांचे बजाज डिस्कव्हर मोटार सायकल नंबर एम एच ०२/ बी सी ८९०७ हिचेवर त्याचा मुलगा नामे यशवंत नरसय्या शेट्टी वय १२ वर्षे व त्याचा मित्र अशपाक सलीम सय्यद वय १२ वर्षे यांना दोघांना घेवुन त्यांचे राहते घरी कलवडवस्ती लोहगांव पुणे येथे जात असतांना एअरपोर्ट रोडवर आकाशनगर समोर विमाननगर पुणे येथे अज्ञात फोर व्हिलर कार चालकाने त्याचे कारची त्यांचे मोटार सायकलला जोरात धडक देवुन मोटार सायकल स्वार व त्याचे पाठीमागे बसलेला यशवंत नरसय्या शेट्टी वय १२ वर्षे आणि अशपाक सलीम सय्यद वय १२ वष असे तिघेही गंभिर जखमी करुन तिघांचेही मरणास कारणीभुत होवुन पोलीसांना अपघाताची खबर न देता पळुन गेलेला असल्याने मयताचा भाऊ नामे मल्याद्री येराय्या शेटटी वय ४० वर्षे रा. कलवड वस्ती लोहगांव पुणे यांनी विमानतळ पोलीस स्टेशन येथे हजर होवुन अज्ञात कार चालकाचे विरुध्द तक्रार दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर २०९/२०१९, भा.दं.वि. कलम २७९,३०४(अ), ४२७, मोटार वाहन कायदा कलम ११९/१७७,१८४,१३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री बळवंत मांडगे यांनी तपास पथकाचे कर्मचारी यांना दाखल गुन्हयातील आरोपीचा तात्काळ शोध घेवुन त्याला अटक करणेचे सुचनां दिल्या.

त्यामुळे तपास पथकाचे पोलीस नाईक संजय आढारी, पोलीस नाईक विष्णु गोणे, पोलीस नाईक विशाल गाडे, पोलीस शिपाई महाजन पोलीस शिपाई पुष्पेंद्र चव्हाण, यांनी अपघात झालेल्या घटनास्थळावर जवळपास असलेले सीसीटीव्ही फुटेज चेक करुन अपघात करणारी मारुती रिटस कार नंबर एम एच १२/ एफ यु ५३०४ हीची माहीती घेवुन तिचे मालक व चालकाची आरटीओ मधुन माहीती प्राप्त करुन कार चालक इसम नामे प्रमोद नानाजीराव कदम,वय-५० वर्षे,रा.सी-९/५४ त्रिदलनगर हौसींग सोसायटी, मोझे शाळेसमोर येरवडा पुणे यास ताब्यात घुेवन त्याचेकडे घडलेल्या गुन्हयाचे अनुशंगाने तपास केला असता,त्याने गुन्हा केलेची कबुली दिल्याने त्यास पोलीस निरीक्षक गुन्हे,बळवंत माडगे यांनी दिनांक १६/०५/२०१९ रोजी २०/३० वाजता अटक करुन सदरचा गुन्हा उघडकिस आणुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक गुन्हे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत.

(राजेंद्र पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर.